## महिलांची नकारात्मक भावना

अनेक महिलांना अगदी बालपणापासून भरपूर नकारात्मक भावना असू शकतात. दीर्घ काळापासून, जाणीव पूर्वक वा अभावितपणे कोंडलेल्या नकारात्मक भावना प्रभावहीन करण्यासाठी आणि दूर घालवून देण्यासाठी महिलांसाठी प्रार्थना लिहीली गेली आहे. काही तर त्यांच्या पूर्व जन्मापासून बाळगलेल्या असतात. आवश्यकतेनुसार ही प्रार्थना वाचल्यानंतर व प्राणा हिलींग वॉण्डने हिलींग केल्यानंतर त्या त्यांच्या शारीरिक, भावनात्मक आणि मानसिक वेदनांपासून मुक्त होऊ शकतात.

### कारण

- जर प्रत्येक महिला आनंदी  झाली तर प्रत्येक घर आनंदी होईल.
- जर प्रत्येक घर आनंदी झाले तर प्रत्येक शहर आनंदी होईल
- जर प्रत्येक  शहर आनंदी झाले तर प्रत्येक देश आनंदी होईल.
- जर प्रत्येक देश आनंदी झाला तर अखिल विश्व आनंदी होईल.
- समस्त महिलांसाठी ‘‘आनंद’’ ही अत्यंत महत्वपूर्ण बाब आहे.

Copyright © All rights reserved

# महिलांसाठी प्रार्थना



मला कधी कधी अत्यंत वाईट वाटते
कारण मी एका स्त्रीचा जन्म घेतला आहे.
मी निराश होते कारण हया आयुष्यात
मी एक स्त्री आहे.
मी तीव्रतेने, पूर्णपणे आणि जाणीवपूर्वक
स्वतःचा स्वीकार करीत आहे.
स्त्री असल्यामुळे मी खूप निराशा अनुभवते.
पहिल्याने माझा मासिक धर्म, अतीव वेदना,
अतीव अस्वस्थता तदनंतर माझ्या सभोवतालचे
सर्व लोक, सासू, जावा, नणंदा, पती, मित्र,
पुरूष सहकर्मी, त्यानंतर मी स्त्री असल्याने
जे करू शकत नाही ते सर्व. मला असहाय,
नाऊमेद, दुखावलेली, नकोशी झाल्याप्रमाणे वाटते.
असं दिसत कि मी काय सहन करत आहे ते
कोणालाही समजत नाही.
मी तीव्रतेने, पूर्णपणे आणि जाणीवपूर्वक
स्वतःचा स्वीकार करीत आहे.
पण मी काय करू शकते ?
ईश्वरा, माझ्या आत्म्याच्या अनेक जन्मांकरिता
ही आपली दैवी योजना व दैवी मार्गदर्शन आहे.

Copyright © All rights reserved



मी तीव्रतेने, पूर्णपणे आणि जाणीवपूर्वक
स्वतःचा स्वीकार करीत आहे.
ईश्वरा, मी आपल्या दैवी योजना व
दैवी मार्गदर्शनाचा स्वीकार करीत आहे.
माझ्यातील आत्मा एखादी स्त्री वा एखादा पुरूष
नाही. मी तुमची दैवी ठिणगी आहे.
मी तुमचे अपत्य आहे.
मी तीव्रतेने, पूर्णपणे आणि जाणीवपूर्वक
स्वतःचा स्वीकार करीत आहे.
ईश्वरा, तुम्हाला ठाऊक आहे कि हया जन्मात फक्त स्त्री
असल्याने मी माझे कर्म संतुलित करू शकत आहे.
त्यामुळे मी तुमच्या दिशेने जाऊ शकते,
तुमच्यात विलीन होऊ शकते आणि
तुमच्याशी एकरूप होऊ शकते.
मी तीव्रतेने, पूर्णपणे आणि जाणीवपूर्वक
स्वतःचा स्वीकार करीत आहे.
ईश्वरा, हया जन्मात मला स्त्री बनवल्याबद्दल आभारी
आहे. मी तीव्रतेने, पूर्णपणे आणि जाणीवपूर्वक
स्वतःचा स्वीकार करीत आहे.
ईश्वरा धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद.

Copyright © All rights reserved